# मार्क्सवाद आणि गांधीवाद समन्वयातील हिंसा आणि अहिंसा याविषयी जावडेकर यांची चिकित्सा : एक अभ्यास

**मनोहर सुभाष निकम**, सहायक प्राध्यापक ,छत्रपती शिवाजी कॉलेज सातारा,८६९८८७४१११.

---

**प्रस्तावना :**

भारताच्या इतिहासात अहिंसा या तत्वाचा प्रचंड प्रमाणात पुरस्कार आणि प्रसार हा इ.स.पूर्व सहाव्या आणि पाचव्या सुरु झालेला दिसतो. हिंसेची वाढ आणि अहिंसा या तत्वाची काळनिकड याठिकाणी इतिहासात महत्वपूर्ण भूमिका बजावताना दिसते. बदलेली उत्पादनाची साधने, शेतीसाठी बैलांची गरज असा भौतिक बदल अहिंसा या तत्वाची आत्यंतिक गरज सूचित करतो. या काळाच्या कसोटीवर गौतम बुद्ध आणि वर्धमान महावीर आपल्या तत्वज्ञान आणि शिकवणुकीत अहिंसा तत्वाला प्राधान्यक्रम देताना दिसतात. यात व्यवहार्य हिंसा आणि अत्यंत कठोर अशी अहिंसा या दोन्हींची दोन टोके देखील उदयाला आलेली दिसतात.

आधुनिक काळात महात्मा गांधीजीनी आधी दक्षिण आफ्रिकेत आणि सन १९१५ नंतर भारतात ब्रिटीश सत्तेचा प्रतिकार करण्यासाठी अहिंसा या तत्वाचा वापर केला याचा थोडक्यात अर्थ अन्यायाविरुद्ध शांततेने आणि दृढ निश्चय याद्वारे प्रतिकार करण्याचा एक नवीन अहिंसक मार्ग म्हणजे सत्याग्रह होय.सत्याचा आग्रह धरताना एक मार्ग म्हणून अहिंसा या तत्वाचा वापर गांधीजीनी केलेला दिसतो. अहिंसा या तत्वामागे गांधीजी यांची व्यवहार्य भूमिका दिसून येते. ती म्हणजे अत्याधुनिक शस्त्र, प्रशिक्षित आणि शिस्तबद्ध अश्या ब्रिटीश सेनेला हिंसक मार्गाने हरविणे अशक्य होते. याबरोबर भारतीय मानसिकता लक्षात घेऊन तत्कालीन काळात गांधीजी यांना अहिंसा या तत्वाचे मोठे महत्व वाटले. यासाठी भारताच्या सास्कृतिक इतिहासाचा प्रभाव त्यांच्यावर पडलेला होता.

जागतिक इतिहासात विशेषतः युरोपच्या इतिहासात ऐतिहासिक भौतिकवादी बदलाच्या चार अवस्था कार्ल मार्क्सने आपल्या मांडणीतून दाखवून दिल्या यातली पाचवी अवस्था म्हणजे साम्यवादाची अंतिम अवस्था त्यांनी मांडली आहे. सर्व अवस्थांमध्ये नवीन अवस्था येताना संघर्ष महत्वपूर्ण ठरतो तो आहे आहे रे आणि नाही रे यांच्यातला म्हणजे संपत्ती धारण करणाऱ्यांचा आणि संपत्तीहीन यांच्यातला यातून एक नवीन अवस्था आकारला येते आणि जुनी नष्ट होते. जगात विविध देशांमध्ये वसाहती करून भांडवलशाही युरोपियन देशांनी प्रस्थापित केली ही भांडवलशाही राष्ट्रे ही अत्याधुनिक शस्त्रांनी सज्ज आहेत. याविरुद्ध कामगार आणि कष्टकरी वर्गाला अपरिहार्य म्हणून हिंसा स्वीकारावी लागेल अर्थात साम्यवादाची अंतिम अवस्था गाठताना ती आवश्यक असेल तर स्वीकारावी असा एकूण मार्क्सवादी साम्यवादी यांचा सूर दिसून येतो.

**उद्देश :-**

जागतिक इतिहासात अनेक देशांची स्वातंत्र्य आंदोलने भारताच्या बरोबर ही अहिंसात्मक मार्गाने झालेली दिसून येतील यात हिंसात्मक प्रतिकार झालाच नाही असे नाही त्यांची देखील इतिहासाला घ्यावी लागते. याचबरोबर अमेरिकन स्वातंत्र्ययुद्ध, फ्रेंच राज्यक्रांती, इटली आणि जर्मनीचे एकीकरण, रशियन राज्यक्रांती आणि चीनची ऑक्टोंबर क्रांती या घटना हिंसात्मक संघर्षावर शिक्कामोर्तब करताना दिसतात. या पार्श्वभूमीवर मार्क्सवाद आणि गांधीवाद यांचे हिंसा आणि अहिंसा या तत्वांमध्ये झालेले विभाजन मार्क्सवाद –गांधीवाद यांच्या एकीकरणात अडथळा ठरते का ? अहिंसा तत्व पूर्णतः स्वीकारून मार्क्सवाद आपली साम्यवादी पाचवी अवस्था गाठू शकेल का ? किंवा गांधीवादाला व्यवहार्य हिंसा अंगीकारणे कितपत शक्य होईल ? असे अनेक प्रश्न या निमित्ताने उभे राहतात. श.द.जावडेकर हे हिंसा आणि अहिंसा या दोन मुद्द्याच्या बाबतीत वेगळ्या पद्धतीने विचार करताना दिसतात.दोन्ही विचारधारेत समन्वय साधताना हिंसा आणि अहिंसा त्या तत्वांच्या बाबतीत वाद आणि संवाद यांच्यावर आजच्या काळात प्रकाश टाकणे हे आवश्यक वाटते.

**मर्यादा :-** अहिंसा आणि हिंसा या दोन मुद्द्यांची व्याप्ती मोठी आहे पण याचा येथे खोलवर विचार न करता केवळ श.द. जावडेकर यांनी मार्क्सवाद आणि गांधीवाद यांच्या समन्वयाच्या अनुषंगाने मांडलेल्या हिंसा आणि अहिंसा या मुद्द्यांचा विचार येथे करायचा आहे.

जावडेकर मते,"मार्क्सवादी व गांधीवादी हे दोन्हीत हिंसा आणि अहिंसा हा मोठा प्रश्न असल्याने त्यांच्यात समन्वय कठीण मानला जातो. त्याचा विचार करावा लागतो." समाजधारणेच्या कार्यात हिंसेचा व विषमतेच्या उपयोगाला मान्यता दिल्यानेच मार्क्सवाद व गांधीवाद निर्माण झाला असे जावडेकर यांना वाटते.[१] या ठिकाणी जावडेकर हिंसा राज्यसंस्थेला समाजनियमनासाठी आवश्यक वाटत असली तरी ती त्यागावी असे वाटते. अहिंसेच्या स्वीकाराणे येणारी चिरस्थिरता

जावडेकर यांना महत्वाची वाटते. पण एखादा गुन्हेगार हा जेव्हा शारीरिक हिंसा वारंवार अंगीकारत असेल आणि त्याला जर अहिंसात्मक उपदेशाने बदलता येत नसेल तर अशावेळी काय करावे ? देशविघातक कृत्य करणारे, दहशतवादाला खतपाणी घालणारे यांच्याविरुद्ध कोणता मार्ग स्वीकारावा राज्यसंस्थेने हा प्रश्न उभा राहतो.

इतिहासमीमांसा व वर्गयुद्ध यासंबंधी मार्क्स आणि गांधी यांच्या विचारसरणीत जो विरोध आहे याबाबतीत देखील समन्वय होण्याची आशा जावडेकर यांना वाटते. त्यांच्या मते मार्क्सने इतिहासाची भौतिकवादी मीमांसा केली तर गांधीजी यांना भौतिकवादच पसंत नव्हता त्यांचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन हा अध्यात्मिक असा होता. जावडेकर मते गांधीजीनी मानवी व्यवहारात अहिंसा प्रभाव पडत आलेला आहे व पुढेही मानवी प्रगती ही अहिंसेकडे होत राहील असे नोंदविले. यासाठी गांधीजीनी मांडलेल्या इतिहासातील मानवी उत्क्रांतीचा दाखला देतात ज्यात मानवाला अहिंसेची गरज वाटत गेली याला ते गांधीची अध्यात्मिक इतिहास मीमांसा मानतात.[२]

याउलट मार्क्सवादानुसार दोन वर्गातील चालणारे शोषण आदिम साम्यवादी अवस्था सोडून निरंतर सुरु राहिले याला अनुसरून मार्क्स हा मानवसमाजाचा एकूण इतिहास हा वर्गयुद्धाचा इतिहास मानतो. ज्यात धर्मसंस्था, राज्यसंस्था, सामाजिक रूढी, नीतिशास्त्र यांनी कष्टकरी, शेतकरी, शोषित बहुजनांची बाजू न घेता धनिक वर्गाचीच बाजू घेतलेली दिसते. क्रांत्याची भूमिका त्यांच्या मते दोन वर्गातील भेद कायम ठेवण्याची राहिलेली आहे. भांडवलदारी शोषक वर्गाची सत्ता कामगार, कष्टकरी एकत्र येऊन घालवणार हे भौतिकवादी मार्क्सवादी तत्वज्ञान आहे. [३]

या पार्श्वभूमीवर जावडेकर यांना दोन्ही विचारधारेत योग्य समन्वयनाची करण्याची गरज वाटते. त्यांना दोन्ही म्हणजे मार्क्सवाद आणि गांधीवाद यांची मीमांसा योग्य वाटते. त्यांच्या मते मानवी जीवनाच्या भौतिक आणि आत्मिक या दोन्ही प्रेरणांचा विचार करायला हवा. त्यांच्या मते मानवी इतिहासाची मीमांसा या दोन्ही तत्वांचा समन्वय करूनच होऊ शकते. त्यांना मार्क्सवाद्यांनी गांधीजींचे मानवी संस्कृतीच्या विकासाचा अहिंसेकडे होणारी वाटचाल स्वीकारावी असे वाटते. याबरोबर गांधीवाद्यांनी देखील मार्क्सवादी वर्गसंस्थेचे उत्पत्ती, विलय आणि अभिवृद्धी या बद्दलच्या विवेचनापासून बोध घ्यावा असे वाटते. [४]

वर्गसंस्था आणि आर्थिक विषमता यांना नष्ट केल्याशिवाय यापुढची धनोउत्पादन आणि समाजधारणा हे कार्य चालू शकणार नाही, याची स्पष्ट जाणीव गांधीवाद्यांनी करून घेतली पाहिजे असे जावडेकर यांना वाटते. पण जावडेकर यांना समाजवादाच्या संस्थापनेसाठी युरोपमध्ये होणारा हिंसात्मक प्रयत्न मान्य नाही त्यांना गांधीजी यांच्याकडून भारतीय स्वातंत्र्य युद्धात अवलंबलेला अहिंसात्मक मार्ग गांधीवाद्यांनी स्वीकारून भविष्यात भारतात लोकशाही समाजवाद यशस्वी करून मार्क्सवादी यांना दाखवावे आणि एक आदर्श घालून द्यावा असे जावडेकर यांना वाटते.[५]

म्हणजे जावडेकर यांना मार्क्सवादी ऐतिहासिक भौतिकवादी मांडणी आणि तत्कालीन समाजात वर्ग विषमता याचे विश्लेषण मंजूर असले तरी लोकशाही समाजवाद आणून समाजातील नष्ट करण्यासाठी अहिंसात्मक हाच मार्ग चिरस्थायी असल्याचे वाटते आणि यावर ते ठाम आहेत.

हरिजन मध्ये १ सप्टेंबर १९४० मध्ये छापलेला गांधीजींचा लेख लक्षात घेतल्यास गांधीजी चातुर्वण्य व्यवस्थेने मजबूत बनलेल्या प्राचीन आणि मध्ययुगीन भारतातील स्वयंपूर्ण अशा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा पुरस्कार करतात. त्यांना ते उद्योग आणि व्यवसाय हे अहिंसक वाटतात. त्यांच्या मते यातून होणारे आदान-प्रदान पैशात होत नसले तरी हिंसक नव्हते, अन्यायकारक वाटत असले तरी सामंजस्य टिकविणारे होते.[६]पण यातून गुणवत्ता असूनही कायमची येणारी आर्थिक विषमता आणि भविष्यातील मिळणाऱ्या संधी नष्ट होतात याकडे दुर्लक्ष करून गांधीजीनी केलेले चातुर्वर्ण्य व्यवस्था टिकविणारे अहिंसेचे समर्थन योग्य ठरत नाही. त्यांच्या या मांडणीतून त्यांचा संकुचितपणा ठळक होतो.

गांधीजीनी सशस्त्र क्रांतीला अहिंसक पर्याय शोधून काढला हे नमूद करतात. त्यांच्या मते, ही नवी अध्यात्मदृष्टी आम्हाला म. गांधींनी दिली आहे व या आधारे आर्थिक, राजकीय व सामाजिक समता सत्याग्रही युद्धाने निर्माण केली पाहिजे. त्यांनी गीतेचे अन्य धर्मतत्वांशी केलेले समन्वयन त्यांना महत्वपूर्ण वाटते. राजधर्माची अपरिहार्य हिंसेपेक्षाही जास्त महत्वाची गांधीजी यांना आत्मबल वाढविणे वाटते. आत्मबलाने पुरेसे साधुत्व निर्माण करता येत नाही, तोपर्यंत ही राजधर्मातील हिंसा अपरिहार्यच भासते. [७] येथे देखील आत्मबल, आत्मिक परिवर्तन हे कुठल्याही बाह्य शारीरिक शिक्षेपेक्षा गांधीजी यांना मोठे वाटते. अहिंसा तत्वाच्या स्वीकारातून येणारी दूरगामी परिणाम करणारी परिस्थिती आणि व्यवस्था त्यांना हवी आहे.

पायाशिवाय इमारत जशी केवळ कवी कल्पनाच मानली जाईल तसेच यादोन्ही विचारसरणीतून निर्माण झालेल्या हिंसा आणि अहिंसेचा प्रश्नाबद्दल म्हणावे लागेल. आर्थिक आणि सामाजिक क्षेत्रातील विषमता आणि राजकीय हिंसा

याबाबींची अपरिहार्यता जेव्हा वाढते तेव्हा मार्क्सवादी विचारसरणीचे महत्व देखील वाढलेले दिसते असे जावडेकर नमूद करतात. गांधीवाद देखील मार्क्सवादी विचारसरणीचा सत्यांश प्राप्त केल्याशिवाय शास्त्ररुपात परिवर्तीत होऊ शकणार नाही असे ते नमूद करतात. [८]

जावडेकर यांनी लिहिलेल्या आधुनिक भारत हा ग्रंथात भारतीय संस्कृतीचे अमृत तत्व या शीर्षकाखाली लिहिलेल्या प्रकरणात भारताच्या पार्श्वभूमीवर गांधीवाद व मार्क्सवाद यांच्या समन्वयाची गरज प्रतिपादित केली आहे. जावडेकर कम्युनिझम आणि फॅसिझम या दोघांची तुलना करताना नमूद करतात की, कार्ल मार्क्सने सामाजिक क्रांती कशी घडवून आणावी याचे उत्तर दिले तर याउलट भांडवलशाही चिरंतन करण्यासाठी व क्रांतीला पायबंद घालण्यासाठी युरोपात फॅसिझमचा उदय झाला. साम्यवाद हा वर्गभेद नष्ट करण्यासाठी तर फॅसिझम हा वर्गभेद कायम ठेऊन समाजक्रांती दडपण्यास प्रयत्नशील आहे. दोन्हींचा शस्त्रबलावर विश्वास आहे. पण आत्मबलाचे निशस्त्र क्रांतीशास्त्र त्यांच्यामते केवळ भारतातूनच सर्वांगीण क्रांती घडवून आणणार. [९]आत्मबलावर त्यांचा असलेला मोठा दृढ विश्वास याठिकाणी दिसून येतो. अर्थात आत्मबल निर्माण करणे ही फार कठीण गोष्ट आहे आणि आत्मबल निर्माण झाल्यावर त्याला टिकविण्यासाठी सतत उजळणी करत राहणे हे त्याहून महाकठीण असल्याचे इतिहासातीलच उदाहरणांवरून दिसून येईल. १९४२ चे चलेजाव आंदोलन आणि गांधीजी यांची बदलेली भूमिकाआपल्याला आत्मबल आणि वास्तवता यातला मोठा फरक दाखवते.

**निष्कर्ष :-**

महात्मा गांधीजी यांनी मांडलेला इतिहासातील मानवी उत्क्रांतीचा आणि विकासाचा अहिंसात्मक प्रवास आणि कार्ल मार्क्सने इतिहासाची केलेली भौतिकवादी वर्गसंघर्षाची भौतिकवादी मीमांसा ज्यात हिंसात्मक बदल देखील सूचित होतो. जावडेकर गांधीजी आणि कार्ल मार्क्स या दोन्हींच्या ऐतिहासिक मांडणीला मान्य करतात परंतु लोकशाही समाजवादाच्या चिरस्थायी स्वरूपासाठी त्यांना अहिंसा हेच तत्व अंगीकारणे आवश्यक वाटते. यासाठी ते हिंसात्मक बदलातून निर्माण झालेल्या देशांच्या आणि क्रांत्यांच्या दुष्परिणामांवर बोट ठेवतात. परंतु व्यवहारात भारतासारखा खंडप्राय देश ज्याची लोकसंख्या आज महाप्रचंड प्रमाणात वाढलेली आहे. त्याबरोबर येथील समस्या भरमसाठ वाढलेल्या आहेत. अश्या देशात अहिंसात्मक बदलाचा प्रयोग करण्यासाठी तेवढीच मोठी गांधीवादी विचारवंतांची फळी कामाला लागावी लागेल मात्र आज तसे होताना दिसत नाही.

धार्मिक असहिष्णुता निर्माण करण्याकडे जेव्हा लोकशाही मार्गाने निवडलेले शासनच झुकते तेव्हा अहिंसात्मक लोकशाही समाजवाद निर्माण करण्याचे स्वप्न हे दिवास्वप्न होऊन जाते. स्वकीयांसाठी अहिंसा आणि विरोधकांसाठी हिंसा असा बदल लोकशाही असो, भांडवलशाही असो वा हुकुमशाही असो स्वीकारला जातो असे खेदाने म्हणावे लागते. जावडेकर यांच्या या मांडणीनुसार हिंसेची देवाणघेवाण नाकारून जर मार्क्सवाद्यांनी अहिंसा स्वीकारायची म्हटली तर रशियन राज्यक्रांती, चीनची ऑक्टोंबर क्रांती ह्या घटनांचा ऐतिहासिक क्रम, पंचवार्षिक योजना हे सर्व ढासळून जाईल. ब्रिटनचाच पंतप्रधान भारत स्वतंत्र झाल्यावर आपले मत नमूद करताना नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या रणांगणावरील संघर्षाची मोठी दखल घेताना दिसतात हे विसरून चालणार नाही.

**संदर्भ :-**

१) पळशीकर सुहास (संपा.), सत्याग्रही समाजवाद आचार्य जावडेकर निवडक लेखसंग्रह, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथम आवृत्ती, सप्टेंबर १९९४,पृ.क्र. २७३ ते २७५

२) कित्ता., पृ.क्र. २६८ ते २६९

३) कित्ता.,पृ.क्र.२७० ते २७१

४) कित्ता.,पृ.क्र. २७१ ते २७२

५) कित्ता.,पृ.क्र.२७२ ते २७३

६) गांधी एम.के., मेरा समाजवाद , नवजीवन मुद्रणालय, अहमदाबाद -१४, डिसेंबर १९५९, पृ.क्र.३५ ते ३६

७) पवार (डॉ.)एस.डी.,सत्याग्रही समाजवाद, डायमंड पब्लिकेशन, पुणे,गांधीवाद आणि मार्क्सवादाचा समन्वय, प्रथम आवृत्ती, २०१६, पृ.क्र. ८४

८) गांधीविचार आणि समकालीन विचारविश्व (गांधीविषयी खंड २) चौसाळकर अशोक (संपा.) साधना प्रकाशन, पुणे ,पहिली आवृत्ती - २०२२, पृ.क्र. १२०

९) जावडेकर श.द., आधुनिक भारत ,कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पुनर्मुद्रण -२०२०, पृ.क्र. ६७० ते ६७१ .